N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0419 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/06/2026 17:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 29/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/06/2026
**Time From (वेळेपासून):** 14:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/06/2026 **Time (वेळ):** 17:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 027
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/06/2026 17:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.4 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती वैजापुर कार्यालया, घरकुल विभागाचे कक्षासमोर,वैजापुर, ता वैजापुर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शांतीलाल देविदास चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888390777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.प्रविण शिवाजी गायकवाड | | | 1. रापानवी, तावैजापुर ,वैजापूर, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 29/06/2026.

मी शांतीलाल देविदास चव्हाण, वय 43 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक-लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो:क्र. 8888390777.

मी वरील प्रमाणे असून सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे मागील दिड वर्षापासुन पोलीस निरीक्षक म्हणुन काम करतो. यातील मुळ तक्रारदार श्री.अमित रमेश पडवळ वय 33 वर्षे, व्यवसाय- शेती व मजुरी, रा.डवाळा, ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक 17/06/2026 रोजी छत्रपती संभाजीनगर शहर परिसरात सुरक्षीत ठिकाणी समक्ष हजर येवुन दोन शासकिय पंच व आमचे◌ समक्ष त्यांचेकडे होत असलेल्या लाचमागणी बाबत प्रथम तोंडी तक्रार सांगितल्यानंतर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.

"´Öß अमित रमेश पडवळ वय 33 वर्षे, व्यवसाय- शेती व मजुरी, रा.डवाळा, ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 8857084242.

आज दि.17/06/2026 रोजी छत्रपती संभाजीनगर शहरात सुरक्षीत ठिकाणी हजर येवुन पो.नि.शांतीलाल चव्हाण लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व दोन शासकिय पंचासमक्ष लेखी तक्रार देतो की, मी वरिल प्रमाणे राहणारा असुन शेती व मजुरी व्यवसाय करुन माझा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. मौजे सुरळा शिवार गट क्र.26 मध्ये माझी शेतजमीन आहे. मी मौजे डवाळा येथील रहिवाशी असल्याने मला घरकुल मिळावे या करिता मी ऑनलाईन फाईल केली होती त्यावरुन मला सन 2025 मध्ये शासनाकडुन घरकुल मंजुर झाले असुन घरकुल बांधकाम सुरु करण्यासाठी म्हणुन पहिला हप्ता 15,000/- रुपये मला मिळालेला आहे. मिळालेल्या रक्कमेतुन बेसमेंट लेवलचे काम करणे असल्याने मी माझ्या शेतावर घरकुलाचे बेसमेंट लेवलचे काम पुर्ण केले आहे. पंचायत समिती वैजापुर कार्यालयातील इंजिनीअर यांनी घरकुल बांधकामाचे पाहणी करुन झाल्याकामाचे फोटो काढुन ते अपलोड केल्यानंतर दुसरा हप्ता 70,000/- रुपये घरकुल लाभार्थी यांना मिळतात. त्यामुळे मी आमचे गावास कामकाजासाठी असलेले इंजिनीअर श्री. प्रविण गायकवाड यांना भेटलो व त्यांना मला दुसरा हप्ता मिळाला नाही. तरी माझ्या घरकुल बांधकामांची पाहणी करुन फोटो अपलोड करावे या संदर्भात बोललो असता श्री.गायकवाड म्हणाले की, मी येतो घरी पाहणी करायला असे म्हणुन दोन महिण्यापुर्वी माझ्या घरी आले. त्यावेळी माझी आई घरी होती त्या दिवशी श्री.गायकवाड यांनी घरकुल बांधकामाची पाहणी करुन फोटो काढले व आईला म्हणाले की, आता मी तुमचे काम करुन देतो, 40 ते 45 दिवसात दुसरा हप्ता 70,000/- रुपये मिळून जाईल, तुम्हाला त्याकरिता मला दोन हजार रुपये 2,000/- द्यावे लागेल. त्यावेळी माझ्या आईने आमचेकडे एवढे पैसे नाहीत असे म्हणुन नाविलाजाने 1,000/- रुपये इंजिनीअर श्री.प्रविण गायकवाड यांना दिले. त्यानंतर दिड ते दोन महिण्याचा कालावधी होवुन ही दुसरा हप्ता 70,000/- रुपये न मिळाल्याने मी दिनांक 16/06/2026 रोजी प्रत्यक्ष श्री.गायकवाड यांची भेट घेवुन त्यांना घरकुल बांधकामाचा दुसरा हप्ता अजुन मिळाला नाही तेवढा चेक देवुन टाका अशी विनंती केली असता श्री.गायकवाड म्हणाले की, तुम्ही राहिलेली रक्कम दिली नाही त्यामुळे तुमचे फोटो अपलोड झाले नाही आता आपल्याला परत फोटो घ्यावे लागणार आहे. त्यानंतर तुम्हाला दुसरा हप्ता मिळेल त्यासाठी मला 1,000/- रुपये लागतील माझी श्री.गायकवाड यांना लाच देण्याची ईच्छा नसतांनाही मी नाईलाजाने त्यांना हो म्हणलो आहे. त्यानंतर मी श्री.गायकवाड यांना तुम्ही माझ्या घरी कधी येणार याबाबत विचारले त्यावर त्यांनी चार-पाच दिवस माझ्याकडे महत्वाचे काम आहे मी पुढच्या गुरुवारी तुझ्याकडे येतो असे म्हणाले आहे.

तरी इंजिनीअर श्री. प्रविण गायकवाड पंचायत समिती कार्यालय वैजापुर हे दिनांक 25/06/2026 रोजी गुरुवारी माझ्या घरकुलाचे फोटो काढण्याकामी माझ्या घरी येणार आहे. त्यावेळी श्री.प्रविण गायकवाड यांनी माझ्याकडे

घरकुलाचा दुसरा हप्ता (चेक) देण्यासाठी व फोटो अपलोड करण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम स्वत: अगर इतरां मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती आहे. माझा व श्री.प्रविण गायकवाड (इंजिनीअर पंचायत समिती वैजापुर) यांचा वैयक्तीक देण्या-घेण्याचा अगर उसणवारीचा कसलाही व्यवहार नाही. श्री.प्रविण गायकवाड व माझे कसलेही भांडण अगर वैर-दुश्मनी ®ÖÖÆüß."

नमुद मजकुराची तक्रार पंच व आमचे समक्ष देण्यात आली सदर तक्रार पंचानी व मुळ तक्रारदार यांनी वाचुन पाहिली व त्यानंतर त्यावर मी, मुळ तक्रारदार व पंच अशांनी दिनांक 17/06/2026 रोजी स्वाक्षरी केल्या आहेत. तक्रारीच्या अनुषंगाने मुळ तक्रारदार श्री.अमित पडवळ यांचेकडे श्री.प्रविण गायकवाड, इंजिनीअर पंचायत समिती वैजापुर हे लाच मागणी करत आहेत अगर कसे या करिता लाचमागणी पडताळणी करणे आवश्यक असल्याने दि. 25/06/2026 रोजी श्री.प्रविण गायकवाड, इंजिनीअर यांची लाचमागणी पडताळणी करण्याबाबत आम्ही, मुळ तक्रारदार व दोन पंच असे सर्वानुमते सदर वेळी निर्णय घेतला.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 25/06/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक असे ला.प्र.वि. कार्यालय येथे हजर आल्यानंतर आम्ही सापळा कारवाई करिता लागणारे सर्व साहित्य सोबत घेवुन शासकिय वाहन क्रमांक एमएच 20 एचएम 9639 ने ला.प्र.वि.कार्यालय येथुन रवाना होवुन वैजापुर शहर परिसरात सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. तेथे मुळ तक्रारदार श्री.पडवळ हे हजर आले त्यांना व पंचाना लाचमागणी पडताळणी कारवाई बाबत योग्य त्या सविस्तर सुचना देवुन सदर कारवाईत व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगून सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मुळ तक्रारदार श्री.पडवळ यांनी अंगावर परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही असा ठेवुन दिला. त्यानंतर पंच क्र.1 श्री.सचिन साठे व मुळ तक्रारदार असे तक्रारदार यांचे खाजगी मोटार सायकलवर बसुन दि. 25/06/2026 रोजी 15.41 वाजता सुरक्षीत ठिकाणावरुन तक्रारदार यांचे घराकडे श्री.प्रविण गायकवाड यांचे भेटीसाठी रवाना केले.

त्यानंतर दि. 25/06/2026 रोजी 16.18 वा. तक्रारदार पडवळ.व पंच क्र.1 श्री.साठे हे सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आले त्यावेळी पंच क्र.2 मंगेश पाचवणे यांचे समक्ष पंच क्र.1 श्री.सचिन साठे यांना तुम्ही सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणापासुन रवाना होवुन ते सदर ठिकाणी परत येई पर्यंत काय घटना घडली या बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार असे आम्ही तक्रारदार यांचे मोटार सायकलवर बसुन त्यांचे घराकडे निघालो तक्रारदार यांचे घरापासुन थोडया अंतरावर इंजिनीअर प्रविण गायकवाड येणाऱ्या रस्त्यावर थांबुन राहिलो थोडयावेळाने तक्रारदार यांचे फोनवर प्रविण गायकवाड यांचा फोन आला व त्यांनी ते फोनवर सुराळाकडुन असलेल्या रस्त्याने तक्रारदार यांचे घराकडे येत असल्याचे सांगितले त्यावर तक्रारदार म्हणाले की, मी ही पाच मिनटामध्ये घराजवळ येतो असे म्हणुन आम्ही मोटार सायकवर बसुन तक्रारदार यांचे घरी गेलो तेवढयात एक ईसम मोटार सायकलवर तक्रारदार यांचे घराजवळ आला. सदर ईसम हे इंजिनीअर प्रविण गायकवाड असल्याचे तक्रारदार यांचे ईशाऱ्याने मला समजले सदर ठिकाणी श्री.गायकवाड यांनी घरकुल बेसमेंट बांधकामाचे फोटो घेतले तेथे तक्रारदार व इंजिनीअर गायकवाड यांच्यात तक्रारदार यांनी घरकुलाचे दुसरा चेक कधी पर्यत पडेल या बाबत विचारले असता श्री.गायकवाड म्हणाले की चाळीस, पंचेचाळीस दिवस हप्ता पडायला लावु राहिले त्यानंतर तक्रारदार यांचे कामासंदर्भात चर्चा झाली. त्यामध्ये श्री.गायकवाड हे तक्रारदार यांना म्हणाले की, "¤êü¾Öã®Ö टाका मंग व्हिजीटचे ÛúÖÆüß" त्यावर तक्रारदार म्हणाले त्या दिवशी दिलते हजार रुपये आजुन लागन का, त्यावर श्री. गायकवाड म्हणाले की, हजार दिलते का पाचशे, त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, हजार दिलते मम्मीने,, असे म्हणुन आता किती द्याव लागन मला ठेकेदारकडून घ्यायचे आहे असे म्हणाले त्यावर श्री.गायकवाड म्हणाले की, हजार एक रुपये द्या,, त्यावर तक्रारदार म्हणाले की, हजार एक रुपये त्यावर श्री.गायकवाड म्हणाले की, हा,, झाला चक्कर तर मी सोमवारी राहील त्यावर तक्रारदार म्हणाले की, एखाद तासामध्ये करतो ऍडजेस्ट त्यावर श्री.गायकवाड म्हणाले की, सोमवारी भेटा काही अडचण नाही असे म्हणुन श्री.गायकवाड हे तेथुन निघुन गेले त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे मो.सा.वर बसुन तेथुन निघुन सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आलो आहे. तेथे पोहं/काळे यांनी तक्रारदार यांचे कडील व्हॉईसरेकॉर्डर काढून तो बंद करून आपले ताब्यात दिला."अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही पंच क्र.2 श्री.मंगेश पाचवणे यांचे समक्ष मुळ तक्रारदार पडवळ यांचेकडे ते सुरक्षीत ठिकाणावरुन रवाना झाले ते परत सुरक्षीत ठिकाणी येणे पर्यंत काय झाले या बाबत विचारणा केली त्यांनीही पंच क्र. 1 यांचे सांगणे प्रमाणे तोंडी हकिगत सांगितली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले. त्यामध्यें श्री.प्रविण गायकवाड इंजिनीअर यांनी मुळ तक्रारदार अमित पडवळ यांचेकडे त्यांचे घरकुल बांधकामाचा दुसरा हप्ता काढुन देण्यासाठी व्हिजीट फी म्हणुन 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच

रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य केले तसेच मागणी केलेली लाचेची रक्कम सोमवारी घेवुन येण्याचे तक्रारदार यांना सांगितले असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरुन सापळा पथक, पंच व तक्रारदार यांना गोपनियतेच्या सुचना देवुन दिनांक 29/06/2026 रोजी पंचायत समिती कार्यालय वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर येथे सापळा कारवाई आजमावण्याचे सर्वानुमते ठरले. सापळा कारवाईकामी संबंधीतास देण्यात येणाऱ्या रक्कमे बाबत मुळ तक्रारदार अमित पडवळ यांना सुचना देवुन सोमवारी सोबत घेवुन येणे बाबत सांगितले. त्यानंतर पथक कार्यालयास परत आले व सदर झाल्या कारवाईचा लाचमागणी पंचनामा करण्यात आला आहे.
त्यानंतर लाचमागणी पडताळणी कारवाई मध्ये ठरवल्या प्रमाणे दिनांक 29/06/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक असे सापळा कारवाई करिता लागणारे सर्व साहित्य सोबत घेवुन शासकिय वाहन क्रमांक एमएच 20 एचएन 8518 ने ला.प्र.वि.कार्यालय येथुन रवाना होवुन वैजापुर शहर परिसरात सुरक्षीत ठिकाणी पोहचलो. तेथे मुळ तक्रारदार श्री.पडवळ हे हजर आले तेथे आम्ही मुळ तक्रारदार, दोन्ही पंच तसेच सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाई बाबत योग्य त्या सुचना देवुन अल्ट्राव्हाईलेट लॅम्प, ऍ◌न्थ्रोसिन पावडर, व्हॉईस रेकॉर्डर या बाबत सविस्तर माहिती दिली. तसेच अल्ट्रा व्हाईलेट लॅम्प व ऍ◌न्थ्रोसिन पावडर चे प्रात्यक्षीक करुन दाखवले◌े.
त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी इंजिनीअर श्री.गायकवाड यांना लाच म्हणुन देण्याकरिता तक्रारदार यांनी हजर केलेली 1,000/- रुपये रोख रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या (2) भारतीय चलनी नोटांचे नंबर कागदावर लिहुन सदर कागद पंच क्र.2 श्री.मंगेश पाचवणे यांचेकडे दिला. सदर नोटांना पो.अं. ताठे यांचे हस्ते ऍ◌न्थ्रोसिन पावडर लावुन सदर रक्कम तक्रारदार यांचे नेसणीस असलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांना सुचना केली की, इंजिनीअर गायकवाड यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर आपण डाव्या हाताने आपल्या खांदयावरिल उपरणे काढुन डाव्या हातामध्येच ठेवावे असा लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित ईशारा करावा. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतमध्ये कोणास दिसणार नाही असा लपविला.त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1श्री.साठे असे तक्रारदार यांच्या मो.सा.ने सुरक्षीत ठिकाणावरुन 13.56 वा.रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 व सापळा पथक असे आमचे शासकिय वाहनाने गेलो.पुढील उर्वरीत फिर्याद ही शब्द मर्यादा संपल्याने एफ.आय.आर.सोबत जोडलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Satyajeet Sudhakar Taitwale(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Satyajeet Sudhakar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन, वैजापूर
जि.छत्रपती संभाजीनगर

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 व सापळा पथक असे आमचे शासकिय वाहनाने गेलो. त्यानंतर तक्रारदार पडवळ यांनी पंचायत समिती कार्यालया जवळ त्यांचे मो.सा. उभे करुन कार्यालयामध्ये गेले. आम्ही ही सापळा पथकासह पंचायत समिती कार्यालय परिसरात दबा धरुन थांबुन राहिलो.

पंचायत समिती कार्यालयात तक्रारदार पडवळ व इंजिनीअर गायकवाड यांची भेट झाली. भेटी दरम्यान त्यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामा संदर्भात चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, कुठ आहे तुम्हाला फोन केला होता. त्यावर इंजिनीअर श्री.गायकवाड म्हणाले की, साईटवर होतो. त्यावर तक्रारदार पडवळ म्हणाले की, बर,,हे एक हजार रुपये असे म्हणुन तक्रारदार यांनी उजव्या हाताने लाचेची रक्कम 1,000/- रुपये काढुन पंच क्र.1 यांचे समक्ष इंजिनीअर श्री.गायकवाड यांचे समोर धरली त्यावेळी इंजिनीअर श्री.प्रविण गायकवाड यांनी तक्रारदार यास चालन असे म्हणुन स्वत: 1,000/- रुपये लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्वनियोजीत ईशारा केला त्यावेळी 14.16 वाजले होते. आम्ही सापळा पथकासह तात्काळ घटनास्थळी हजर आलो. आम्ही 14.18 वाजता इंजिनीअर प्रविण गायकवाड यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही इंजिनीअर प्रविण गायकवाड यांना आमचा व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.प्रविण शिवाजी गायकवाड वय 29 वर्षे व्यवसाय-नोकरी, पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर रा.पानवी, ता.वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगितले त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष सदर ठिकाणीच पंचायत समिती कार्यालयातील सभागृहामध्ये अंधार करुन ॲन्थ्रासिनं पावडर संदर्भातील प्रात्यक्षीक कार्यवाही केली त्यावेळी इंजिनीअर श्री.गायकवाड यांचे उजव्या हातावर ठिक-ठिकाणी तसेच त्यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुस खिश्याचे आत व खिश्याचे तोंडावर लाचेच्या रक्कमेवर ॲन्थ्रोसिंन पावडरच्या हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली सदरची बाब इंजिनीअर गायकवाड व दोन्ही पंच यांचे निर्दशनास आणून देण्यात आली. त्यानंतर इंजिनीअर गायकवाड यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम 1,000/- रुपये हस्तगत करुन ती पंच क्र.2 यांचे ताब्यात दिली. त्यानंतर सदरचे घटनास्थळाचे कच्चे टिपण घेवुन तेथुन आम्ही सर्वजण पुढील कार्यवाईकामी पोलीस ठाणे वैजापुर, ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर येथे गेलो. सदर ठिकाणी पो.स्टे.प्रभारी वैजापुर यांना एका स्वतंत्र कक्षाची मागणी करून त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कक्षामध्ये वरिल घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यांत आला आहे.

तरी दि. 29/06/2026 रोजी श्री.प्रविण शिवाजी गायकवाड, वय 29 वर्षे व्यवसाय-नोकरी, पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर यांनी मुळ तक्रारदार श्री.अमित पडवळ यांचेकडे त्यांचे घरकुलाचा दुसरा हप्ता (चेक) देण्यासाठी व फोटो अपलोड करण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम दिनांक 29/06/2026 रोजी 14.16 वाजता पंचायत समिती वैजापुर कार्यालयातील घरकुल विभागाचे कक्षासमोर वैजापुर येथे पंच क्र. 1 यांचे समक्ष स्वत: स्विकारले आहे.

नमुद लोकसेवक श्री.प्रविण शिवाजी गायकवाड पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर यांनी त्यांना दिलेल्या अधिकारानुसार शासकीय नियत कायदेशिर काम नियमाप्रमाणे करण्याची त्यांची जबाबदारी असतांना त्यांनी त्यांचे शासकीय कायदेशिर काम करण्यांसाठी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेउन कायदेशिर परिश्रमाखेरीज अन्य परितोषण म्हणुन लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारुन गैरलाभ मिळवला आहे. म्हणुन माझी श्री.प्रविण शिवाजी गायकवाड, वय 29 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

**हि फिर्याद दिली सही.**

**(शांतीलाल चव्हाण)**
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर

**पोलीस ठाणे अमलदार**
**पोलीस स्टेशन, वैजापूर**
**जि.छत्रपती संभाजीनगर**

, त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र.2 व सापळा पथक असे आमचे शासकिय वाहनाने गेलो. त्यानंतर तक्रारदार पडवळ यांनी पंचायत समिती कार्यालया जवळ त्यांचे मो.सा. उभे करुन कार्यालयामध्ये गेले. आम्ही ही सापळा पथकासह पंचायत समिती कार्यालय परिसरात दबा धरुन थांबुन राहिलो.

पंचायत समिती कार्यालयात तक्रारदार पडवळ व इंजिनीअर गायकवाड यांची भेट झाली. भेटी दरम्यान त्यांचेमध्ये तक्रारदार यांचे कामा संदर्भात चर्चा झाली त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, कुठ आहे तुम्हाला फोन केला होता. त्यावर इंजिनीअर श्री.गायकवाड म्हणाले की, साईटवर होतो. त्यावर तक्रारदार पडवळ म्हणाले की, बर,,हे एक हजार रुपये असे म्हणुन तक्रारदार यांनी उजव्या हाताने लाचेची रक्कम 1,000/- रुपये काढुन पंच क्र.1 यांचे समक्ष इंजिनीअर श्री.गायकवाड यांचे समोर धरली त्यावेळी इंजिनीअर श्री.प्रविण गायकवाड यांनी तक्रारदार यास चालन असे म्हणुन स्वत: 1,000/- रुपये लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्वनियोजीत ईशारा केला त्यावेळी 14.16 वाजले होते. आम्ही सापळा पथकासह तात्काळ घटनास्थळी हजर आलो. आम्ही 14.18 वाजता इंजिनीअर प्रविण गायकवाड यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही इंजिनीअर प्रविण गायकवाड यांना आमचा व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.प्रविण शिवाजी गायकवाड वय 29 वर्षे व्यवसाय-नोकरी, पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर रा.पानवी, ता.वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगितले त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष सदर ठिकाणीच पंचायत समिती कार्यालयातील सभागृहामध्ये अंधार करुन ॲन्थ्रासिनं पावडर संदर्भातील प्रात्यक्षीक कार्यवाही केली त्यावेळी इंजिनीअर श्री.गायकवाड यांचे उजव्या हातावर ठिक-ठिकाणी तसेच त्यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुस खिश्याचे आत व खिश्याचे तोंडावर लाचेच्या रक्कमेवर ॲन्थ्रोसिंन पावडरच्या हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली सदरची बाब इंजिनीअर गायकवाड व दोन्ही पंच यांचे निर्दशनास आणून देण्यात आली. त्यानंतर इंजिनीअर गायकवाड यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम 1,000/- रुपये हस्तगत करुन ती पंच क्र.2 यांचे ताब्यात दिली. त्यानंतर सदरचे घटनास्थळाचे कच्चे टिपण घेवुन तेथुन आम्ही सर्वजण पुढील कार्यवाईकामी पोलीस ठाणे वैजापुर, ता.वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर येथे गेलो. सदर ठिकाणी पो.स्टे.प्रभारी वैजापुर यांना एका स्वतंत्र कक्षाची मागणी करुन त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कक्षामध्ये वरिल घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यांत आला आहे.

तरी दि. 29/06/2026 रोजी श्री.प्रविण शिवाजी गायकवाड, वय 29 वर्षे व्यवसाय-नोकरी, पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर यांनी मुळ तक्रारदार श्री.अमित पडवळ यांचेकडे त्यांचे घरकुलाचा दुसरा हप्ता (चेक) देण्यासाठी व फोटो अपलोड करण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम दिनांक 29/06/2026 रोजी 14.16 वाजता पंचायत समिती वैजापुर कार्यालयातील घरकुल विभागाचे कक्षासमोर वैजापुर येथे पंच क्र. 1 यांचे समक्ष स्वत: स्विकारले आहे.

नमुद लोकसेवक श्री.प्रविण शिवाजी गायकवाड पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर यांनी त्यांना दिलेल्या अधिकारानुसार शासकीय नियत कायदेशिर काम नियमाप्रमाणे करण्याची त्यांची जबाबदारी असतांना त्यांनी त्यांचे शासकीय कायदेशिर काम करण्यांसाठी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेउन कायदेशिर परिश्रमाखेरीज अन्य परितोषण म्हणुन लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारुन गैरलाभ मिळवला आहे. म्हणुन माझी श्री.प्रविण शिवाजी गायकवाड, वय 29 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती वैजापुर यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

हि फिर्याद दिली सही.

(शांतीलाल चव्हाण)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन, वैजापूर
जि.छत्रपती संभाजीनगर